महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 28 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 244 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# मुख्यमंत्र्यांनी शंभर दिवसांच्या कामाचा घेतला आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थित 100 दिवसांच्या कार्यक्रमाचा अंतरिम आढावा घेण्यात आला. आतापर्यंत केलेल्या चांगल्या कामाचा यामध्ये आढावा घेण्यात आला. 7 जानेवारी ते 16 एप्रिल 2025 या कालावधीत जी कामं झाली त्यासंदर्भात चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. या बैठकीला मंत्रालय सचिवांपासून ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांपर्यंत 6854 अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रम, तालुका स्तरापर्यंत अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती. दरम्यान, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना विविध



सूचना दिल्या आहेत. नावीन्यपूर्ण उपक्रमांची यादी तयार करा, त्या इतरांनाही सांगा अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. गुंतवणूक येत असताना गुड गव्हर्नन्स द्या, संपूर्ण कालावधीचा आढावा आल्यानंतर 1 मे रोजी याचा सार्वजनिक कार्यक्रम करु असेही फडणवीस म्हणाले. संकेतस्थळे फुलप्रूफ करा. दरम्यान, यावेळी लक्षणीय कामगिरी करणाऱ्या 15 अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

**कृती आराखडा तयार करण्याचे आदेश**

महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर फडणवीस यांनी प्रत्येक खात्याला 100 दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिले होते. या आराखड्यात लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजना, राज्याचे पुढारलेपण कायम ठेवत प्रगतीच्या शिखरावर नेणाऱ्या कामगिरीचा समावेश असावा, असे निर्देश देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढील 100 दिवसांच्या आराखड्यातून विभागांनी ठोस कामगिरी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच सरकारी योजनांची योग्य अंमलबजावणी करावी अशा सूचना देखील फडणवीस यांनी या बैठकीत दिल्या आहेत.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पंधरा अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र**

पालघर पोलिस अधीक्षक : बाळासाहेब पाटील
सातारा पोलिस अधीक्षक : समीर अस्लाम शेख
संभाजीनगर आयजी : वीरेंद्र मिश्रा
मुंबई पोलिस आयुक्त : विवेक फणसाळकर
गृह, अतिरिक्त मुख्य सचिव: इकबालसिंग चहल
आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका: शेखर सिंग
आयुक्त, ठाणे महापालिका: सौरभ राव
मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे, जिप: विशाल नारवाडे
मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर, जिप: विवेक जॉन्सन
जिल्हाधिकारी, नागपूर: विपीन इटनकर
जिल्हाधिकारी, जळगाव: आयुष प्रसाद
विभागीय आयुक्त, पुणे: डॉ. पुलुकंडवार
आदिवासी आयुक्त: लिना बनसोडे
आयुक्त वैद्यकीय शिक्षण: राजीव निवतकर
सचिव, मृद व जलसंधारण: गणेश पाटील

---

**थोडक्यात महत्वाचे**

# अमृत योजनेच्या कामांना गती द्या
## आमदार राजेश मोरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. २७ :** कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात राज्य सरकारच्या अमृत योजनेतून विकासाची कामे अनेक वर्षांपासून सुरू आहेत. ही कामे सध्या संथ गतीने सुरू असून त्यांना वेग देण्याच्या सूचना आमदार राजेश मोरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. नुकतीच आमदार मोरे यांनी या कामाची पाहणी केली. कल्याण ग्रामीण मतदारसंघातील आडीवली ढोकळी प्रभागात राज्य सरकारच्या योजनेतून रस्त्याची कामे केली जात आहेत. या परिसरातील तलावाचे सुशोभीकरणाचे कामही करण्यात येत आहे. रस्त्याच्या कडेने गटारांची बांधणी, अमृत पाणी योजनेतून पाण्याच्या टाक्या उभारणे, जलवाहिन्या टाकणे ही कामे सुरू आहेत. ही कामे काम संथगतीने सुरू आहेत. या कामांची मोरे यांनी नुकतीच पाहणी केली. कामांचा वेग वाढवून मार्चअखेरीस कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याच्या सूचना मोरे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**ढोकळी परिसराचे रूपडे पालटणार**

गावे महापालिकेत समाविष्ट झाली; मात्र त्यांना मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. आडीवली ढोकळी परिसरात रस्त्यांची कामे, तलावांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर आडीवली ढोकळी परिसराचे रूपडे पालटणार आहे. यामुळे येथील कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# मोहने-टिटवाळा परिसराच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध – माजी आमदार नरेंद्र पवार



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मोहने आणि टिटवाळा परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे अभिवचन भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिले. त्यांच्या विशेष प्रयत्नांमुळे माजी राज्यसभा खासदार व्ही. मुरलीधरन यांच्या खासदार निधीतून गाळेगाव परिसरात विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

नरेंद्र पवार यांनी सांगितले की, कल्याण विधानसभा मतदारसंघ आणि परिसरात अनेक महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प वेगाने सुरू आहेत. काही कामे केंद्र सरकारच्या अखत्यारीत तर काही राज्य सरकारमार्फत होत आहेत, त्यामुळे कल्याण आणि आसपासचा परिसर वाहतूक आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा केंद्रबिंदू बनत आहे.

"मुंबईतून महाराष्ट्रातील तसेच देशातील कोणत्याही भागात जाण्यासाठी आवश्यक असणारी रस्ते कनेक्टिव्हिटी कल्याणच्या आसपास उभी राहत आहे. भविष्यात हा परिसर 'तिसरी मुंबई' म्हणून नावारूपाला येईल आणि त्यात मोहने-टिटवाळा परिसराचा मोठा वाटा असेल," असे त्यांनी स्पष्ट केले.

---

# शिक्षक कपात धोरण शिक्षक सेना आक्रमक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शासन निर्णयानुसार राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षक कपात करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक विषय शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध होणार नाहीत, याचा थेट परिणाम शिक्षण व्यवस्थेवर होणार आहे. आदिवासी, दुर्गम भागातील शाळा, मराठी शाळा, रात्र शाळा आणि भाषिक शाळा बंद पडण्याची भीती यामुळे निर्माण झाली आहे. या शासन निर्णयाविरोधात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने गुरुवारी बीजे हायस्कूल येथील माध्यमिक शिक्षण विभागाच्या समोर तीव्र आंदोलन करण्यात आले. शिवसेना (उबाठा) नेते केदार दिघे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. या आंदोलनात जिल्ह्याच्या विविध भागातील शिक्षक सहभागी झाले होते.

या आंदोलनादरम्यान शिक्षकांनी घोषणाबाजी करत सरकारच्या धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त केला. शिक्षक कपातीमुळे शिक्षण व्यवस्था कोलमडणार असून, ग्रामीण भागातील, आदिवासी, मराठी, आणि रात्र शाळांवर मोठा परिणाम होणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. तसेच नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवायचे असेल, तर शिक्षक संख्येत वाढ करणे आवश्यक होते. मात्र, याउलट सरकार शाळा टिकवण्या ऐवजी बंद करण्याचा डाव आखत असल्याचा आरोप यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेने केला आहे.

**या आहेत शिक्षकांच्या प्रमुख मागण्या**

* शिक्षक कपातीचा निर्णय त्वरित रद्द करावा.
* नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी शिक्षक संख्येत वाढ करावी.
* ग्रामीण, आदिवासी, मराठी, व भाषिक शाळांचे संरक्षण करावे.
* रात्र शाळा व दुर्गम भागातील शाळा बंद होणार नाहीत याची हमी द्यावी.
* विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्काचे संरक्षण करावे.

शिक्षक सेनेच्या ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान गावडे यांनी सांगितले की, 'शाळा टिकल्या तरच शिक्षण टिकेल' या घोषणेसह हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला आहे. राज्य सरकारच्या शिक्षकांविरोधातील धोरणाविरुद्ध राज्यभरात आंदोलन होत आहे. ठाण्यातील शिक्षकांचाही या धोरणाला तीव्र विरोध असून ठाणे जिल्ह्याच्या शहरी तसेच ग्रामीण भागातील शिक्षक या आंदोलनात सहभागी झाले होते.

> विद्यार्थ्यांचे भवितव्य त्यांच्या शिक्षकांवर अवलंबून आहे. शिक्षकांच्या हक्कांवर आणि पर्यायाने मराठी शाळांवर गदा आणली तर पुढची पिढी घडणार कशी? त्यामुळे राज्य सरकारने शिक्षक कपात रद्द करून शिक्षकांना न्याय द्यावा.
>
> • केदार दिघे, जिल्हाप्रमुख शिवसेना (उबाठा)

---

# कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचा शिलकी अर्थसंकल्प सादर

**अर्थसंकल्प सादर करताना कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री मारुती गायकवाड तसेच सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. अर्थसंकल्प अंतिम मंजुरीसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर करण्यात आला.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कुळगाव बदलापूर नगर परिषदेचा सन२०२५-२६ चा शिलकीचा अर्थसंकल्प सादर दि.२४/०२/२०२५ रोजी मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी श्री मारुती गायकवाड यांना लेखापाल श्री विकास चव्हाण यांनी सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक सादर केले. या अर्थसंकल्पामध्ये एकूण जमा रुपये ६१९.५७ कोटी तसेच खर्च रुपये ६१९.५२ कोटी व शिल्लक रुपये ५.०४ लक्ष असून सदर अर्थसंकल्पामध्ये कोणतीही कर वाढ सुचवण्यात आलेली नाही. कुळगाव बदलापूर नगर परिषदेने अर्थसंकल्पामध्ये काही महत्त्वाच्या तरतुदी सुचवल्या असून रस्ते बांधणी साठी रुपये २.५ कोटी, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) रुपये ५० कोटीची तरतूद केलेली आहे तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) रुपये १०० कोटी, घनकचरा व्यवस्थापन रुपये ३४ कोटी व आपत्ती व्यवस्थापन रुपये २५ लक्ष ची तरतूद केलेली आहे.तसेच शहरातील नागरिकांसाठी काही विशेष तरतुदी सुचविण्यात आलेल्या आहेत महिला व बालकल्याण साठी रुपये १.३९ कोटी, दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी रुपये १.३९ कोटी तसेच ज्येष्ठ नागरिकांना सेवा सुविधा पुरविण्यासाठी रुपये १० लक्ष ची तरतूद करण्यात आलेली आहे .

---

# झिरो बॅलन्सची करपावती सादर करा; अन्यथा कारवाई !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** - एकीकडे नागरिकांना 'अभय योजने' अंतर्गत टॅक्स अर्थात मालमत्ता कर भरण्याचे आवाहन करण्यात येत असतानाच, दुसरीकडे ॲक्शन मोडवर आलेल्या उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी अद्यापही मालमत्ता कराचा भरणा केला नसेल, तर त्यांनी 'अभय योजने'च्या कालावधीमध्ये कराच्या रकमेचा भरणा करुन झिरो बॅलन्स असल्याची करपावती सादर करावी असा आदेश जारी केला आहे. अन्यथा



**उल्हासनगर पालिका आयुक्तांचा अधिकारी; कर्मचाऱ्यांना इशारा**

प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असा इशारा देखील त्यांनी दिला आहे दिला आहे. महानगरपालिकेच्या इतिहासात अशाप्रकारचा आदेश आणि इशारा हा पहिल्यांदाच आयएएस अधिकारी असलेल्या आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी दिल्याने हा चर्चेचा विषय ठरला आहे. महापालिकेत कार्यरत कर्मचा-यापैकी 70 ते 75 टक्के अधिकारी-कर्मचारी हे स्थानिक असून त्यात डॉक्टर्स, अधिक्षक, वरिष्ठ लिपीक, लिपीक, शिक्षक, नर्स, मुकादम, माळी, मजुर, सफाई कामगार, तारतंत्री, विजतंत्री, शिपाई, विद्युत मदतनीस, सुरक्षारक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचा समावेश आहे. या सर्वांनी 2024-25 या चालू वर्षाकरिता 24 फेब्रुवारी ते 18 मार्च पर्यंत लागू करण्यात आलेल्या अंतिम अभय योजनेअंतर्गत 6 मार्चपर्यंत भरणा केल्यास 100 टक्के विलंब शास्ती माफ करण्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिक या नात्याने दायित्व सिध्द करणे आवश्यक आहे. ही बाब महानगरपालिकेच्या उत्पन्नाशी निगडीत असल्याने, सर्व स्थानिक अधिकारी व कर्मचारी यांनी आपले मालमत्ता कराचा भरणा करणे आवश्यक आहे.

कराचा भरणा केला नसल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई येणार असे आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

---

# आरटीई प्रवेश प्रक्रियेकडे पालकांची पाठ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २७ :** आरटीईअंतर्गत विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली आहे. मात्र, निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आतापर्यंत केवळ तीन हजार ७०३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पालकांनी आरटीई प्रवेश प्रक्रियेकडे पाठ फिरवली का? अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. दरम्यान, आरटीईअंतर्गत होणाऱ्या २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत ठाणे जिल्ह्यातून १० हजार ४२९ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. निवड झाल्यानंतर शिक्षण विभागाकडून पालकांना संदेश पाठवण्यात आले आहेत. मात्र, त्याकडे पालकांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. वंचित, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी

**पालकांचे संदेशाकडे दुर्लक्ष**

**आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी निवड झाल्यासंदर्भात आणि प्रवेश निश्चित करण्यासाठी तारीख, वेळ, ठिकाण याची माहिती पालकांना संदेशाद्वारे दिली जात आहे. परंतु, पालकांचे या संदेशाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे काही पालक प्रवेश निश्चित करण्यासाठी अद्याप आलेले नाहीत, असा दावा प्राथमिक शिक्षणविभागाकडून करण्यात आला आहे.**

राबवण्यात येणाऱ्या २५ टक्के आरटीई प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ साठी १४ जानेवारीपासून सुरुवात झाली. हे प्रवेश अर्ज भरण्यासाठी सुरुवातीला २७ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर प्रवेश अर्ज स्वीकारण्याची मुदत २ फेब्रुवारीपर्यंत वाढवण्यात आली. त्यानुसार १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील २५ हजार ७७४ विद्यार्थ्यांचे आरटीई प्रवेशासाठी अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १० हजार ४२९ विद्यार्थ्यांची आरटीई प्रवेशासाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेश निश्चित करण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली आहे. प्रवेश निश्चित करण्यासाठी १५ दिवसांची मुदत मिळूनही आतापर्यंत केवळ तीन हजार ७०३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. त्यामुळे आरटीई प्रवेशाकडे पालकांनी पाठ फिरवली का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर, निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी तीन विद्यार्थ्यांचा प्रवेश कागदपत्रांच्या त्रुटीअभावी नाकारण्यात आल्याची माहिती ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

---

# जयंत पाटीलांची शहापूरला आकस्मिक भेट
## स्थानिक स्वराज्यसाठी तयारीला लागण्याच्या सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) चे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बुधवारी सायंकाळी अचानक शहापूर शहरात येऊन प्रमुख कार्यकर्त्यांची भेट घेतली. राज्यात ठिकठिकाणी पक्षाला गळती लागलेली असतांना पक्षफुटीच्या पार्श्वभूमीवर पाटील यांच्या या शहापूर भेटीला महत्त्व आले आहे. जयंत पाटील बुधवारी नाशिकमध्ये होते. तिकडून मुंबईकडे जात असतांना त्यांनी आकस्मिक शहापूरला कार्यकर्त्यांना भेट दिली. विधानसभा निवडणूकांच्या निकालानंतर महाविकास आघाडीतील पक्षांना चांगलीच गळती लागली आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस (शप), शिवसेना उबाठा आणि अखिल भारतीय काँग्रेस या तीन प्रमुख पक्षांतील कार्यकर्ते सत्ताधारी भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात डेरेदाखल होऊ लागले आहेत. तर कार्यकर्त्यांच्या पक्षांतरामुळे मतदारसंघातले चित्र बदलू लागले आहे. त्यातच आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका येणार असल्याने कार्यकर्त्यांच्या पक्षांतराने स्थानिक पातळीवरची राजकीय परिस्थिती बदलून गेली आहे. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे मोठे आव्हान शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि काँग्रेस समोर आहे. अशातच कार्यकर्ते पक्ष सोडू लागल्याने मविआतील तीन्ही पक्षांचे थेट प्रदेश पातळीवरचे नेते देखील धास्तावले आहेत. त्यांनी बॅडपॅच रोखण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. त्यामुळे जयंत पाटील यांनी बुधवारी शहापूरला दिलेली भेट महत्त्वाची मानली जात आहे. या भेटीत पाटील यांनी विधानसभा निवडणूकीत पक्षाचा उमेदवार पराभूत झाल्याची मिमांसा कार्यकर्त्यांकडून जाणून घेतली. कुठल्या भागात मते कमी पडली तसेच पक्षाच्या धोरणात काय बदल करणे आवश्यक होते, याबाबत कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया पाटील यांनी ऐकल्या. पक्षाच्या तालुका कार्यकारिणीत बदल करायचे असून नव्याने पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात येणार आहेत. तालुका अध्यक्ष देखील बदलण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने पाटील यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्याचे सांगण्यात येत आहे.

> प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांची भेट घेतली.पुढील वाटचालीबाबत व पक्षाच्या संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने सूचना दिल्या.
>
> • विद्या वेखंडे, जिल्हाध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस

> बुधवारच्या भेटीत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी येत्या जि. प. तसेच पंचायत समितीच्या निवडणूकांसाठी तयार राहण्यास सागितले आहे. स्वच्छ प्रतिमेचे व परिसरात दांडगा जनसंपर्क असलेल्या उमेदवारांना उमेदवारी देण्याचे सुतोवाच त्यांनी केले आहे. आम्ही देखील शहापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचा निष्ठावान कार्यकर्ता पक्षातून बाजूला जाणार नाही, असा विश्वास दिला आहे.
>
> • अविनाश थोरात, जिल्हाध्यक्ष, सामाजिक न्याय विभाग, राष्ट्रवादी काँग्रेस

# गीतासार



तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ । पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ३-४१ ॥

म्हणून हे अर्जुना, तू प्रथम इंद्रियांवर ताबा ठेवून, या ज्ञान आणि विज्ञान यांचा नाश करणाऱ्या, मोठ्या पापी कामाला अवश्य बळेच मारून टाक. ॥ ३-४१ ॥

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः । मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ३-४२ ॥

इंद्रियांना स्थूलशरीराहून पर म्हणजे श्रेष्ठ, बलवान आणि सूक्ष्म म्हटले जाते. या इंद्रियांहून मन पर आहे. मनाहून बुद्धी पर आहे. आणि जो बुद्धीहूनही अत्यंत पर आहे, तो आत्मा होय. ॥ ३-४२ ॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना । जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ३-४३ ॥

अशा प्रकारे बुद्धीहून पर अर्थात सूक्ष्म, बलवान व अत्यंत श्रेष्ठ असा आत्मा आहे, हे जाणून आणि बुद्धीच्या द्वारा मनाला स्वाधीन करून, हे महाबाहो, तू या कामरूप अजिंक्य शत्रूला मारून टाक. ॥ ३-४३ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्‌भगवद्‌गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील कर्मयोगः नावाचा हा तिसरा अध्याय समाप्त झाला. ॥ ३ ॥

# रेसिपी

## कच्च्या केळ्याचे कटलेट



साहित्य : 3 कच्ची केळी, 2 बटाटे, साबूदाण्याचे पीठ, 2 हिरव्या मिरच्या, लाल मिरची पावडर, 1 चमचा जिरे पावडर, मीठ आणि तळण्यासाठी तेल

कृती :कटलेट बनवण्यासाठी केळी आणि बटाटे उकडून घ्या. नंतर कुकर थंड झाल्यानंतर दोन्ही एका भांड्यात काढून घ्या. थंड झाल्यानंतर बटाटे आणि केळ्यांची सालं काढून घ्या. आणि एका मोठ्या भांड्यात काढून घ्या.

बटाटे आणि केळी एकत्र कुस्करुन घ्या. त्यानंतर यात हिरवी मिरची बारीक कापून टाका नंतर सगळे मसाले टाकून मिश्रण चांगले एकजीव करुन घ्या. त्यानंतर शेवटी साबुदाण्याचे पीठ टाकून चांगले मिक्स करुन घ्या. त्यानंतर टिक्कीसारखा आकार द्या. त्यासाठी हातांना थोडे तेल लावून छोट्या छोट्या आकाराचे कटलेट करुन घ्या.

आता एक नॉन स्टिक पॅन घेऊन त्यात तेल किंवा तूप टाका. नंतर त्यात कटलेट ठेवून दोन्हीकडून सोनेरी रंग येईपर्यंत परतवून घ्या. आता हे कटलेट तुम्ही दही किंवा चटणीसोबत खावू शकता.

### फराळी पॅटिस कसे बनवायचे याची रेसिपी पाहूयात.

बटाटे, मीठ, मनुका, काजू, दाण्याचा कूट, सुक खोबरं, साखर, हिरव्या मिरचीची पेस्ट, कोथिंबीर, तेल

सगळ्यात आधी उकटलेले बटाटे किसून त्याचा बारीक किस करुन घ्या. आता त्यात चवीनुसार मीठ टाकून मिश्रण चांगले एकजीव करा. त्यानंतर थोडासा किसलेला बटाटा, हिरव्या मिरचीची पेस्ट, मनुका, काजू यांचे काप आणि दाण्याचा कूट, लिंबाचा रस, किसलेले सुकं खोबरं, बारीक चिरलेली कोथिंबीर हे एकजीव करुन पॅटीसच्या आतील स्टफिंग करुन घ्या. त्यानंतर हे फराळी पॅटिसचे आवरणाचा गोळा घेऊन त्यात स्टफिंग भरुन घ्या आणि गोलाकार आकार देऊन पॅटिस गरम तेलात तळून घ्या.

# नागरिकांना गुणवत्तापूर्ण गतीमान व सुलभरितीने सेवा द्या

## – सचिव डॉ.गोविंदराज



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगडः शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत रायगड जिल्हा राज्यात अग्रेसर आहे. नागरिकांना गुणवत्तापूर्ण, अधिक गतीमान व सुलभरितीने सेवा देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणानी समन्वयाने काम करावे अशा सूचना नगरविकास विभाग(2)चे प्रधान सचिव डॉ के एच गोविंदराज यांनी दिल्या

जिल्हाधिकारी कार्यालयात 100 दिवस कृती आराखड्याबाबत आयोजित आढावा बैठकीमध्ये पालकसचिव गोविंदराज बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी सत्यजित बडे, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी सा.प्र. रविंद्र शेळके यांसह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात लोकाभिमुखता, गतिशीलता आणि पारदर्शकता आणण्यासाठी संपूर्ण राज्यभरामध्ये 100 दिवसांचा कृती आराखडा राबविण्यात येत आहे. या आराखड्यानुसार जिल्ह्यात समाधानकारक काम करण्यात येत आहे. ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे.सर्व प्रशासनाने यापेक्षा अधिक उत्तम काम करण्याची जिल्ह्यातील अधिकाऱ्यांमध्ये क्षमता आहे. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी नाविन्यपूर्ण व कल्पकतेमधून उपक्रम राबवून आपले कार्यालय व जिल्हा आदर्श होईल, यादृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सादरीकरणाद्वारे जिल्हा प्रशासनाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड यांनी जिल्हा परिषदे अंतर्गत सुरु असलेल्या उपक्रमांचे सादरीकरण केले. पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी पनवेल मनपाच्या कमांचे सादरीकरण केले. या बैठकीला सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# पद्मश्री चैत्राम पवार यांचा सत्कार सोहळा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वनवासी कल्याण आश्रम, जनजाती विकास मंच आणि केशव सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने ग्रामविकास पुरूष अशी ओळख असलेले चैत्रामजी पवार यांना नुकताच प्रतिषठेचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे या निमित्ताने त्यांचा सत्कार सोहळा दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वा.प्रगती प्रतिष्ठान, जव्हार येथे आयोजित केला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रामदास मारड असून पालघर चे खासदार डॉ. हेमंत सरवा, विक्रमगड आमदार हरिश्चंद्र भोये यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. या प्रसंगी आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त आणि आदिवासी समाजात भरीव कार्य केलेल्या मान्यवरांचा ही सन्मान होणार आहे.

धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या गावाचे रहिवाशी असलेले श्री चैत्राम पवार हे गेल्या तीस वर्षांपासून बारीपाडा येथे ग्रामविकासाच काम करीत आहेत जल, जमीन, जंगल, जनावर आणि जन या पंच सूत्रीच्या आधारे आपल्या गावात राहून गावाचा विकास कसा करता येईल याच जागतिक स्तरावरील उत्तम मॉडेल म्हणून त्यांनी बारिपाड्याचा विकास करुण दाखविला आहे. अशा कर्तृत्ववा व्यक्तीच्या सोहल्यास बहुसंखेने उपास्थित राहावे अशी आयोजकांनी विनंती केली आहे.

# राष्ट्रीय विज्ञान दिन



संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात.

भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले. तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याची नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न त्यांना पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले. रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या सर्व भारतीयांना मनापासून शुभेच्छा!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# महावितरणच्या कामगारांची कल्याणमध्ये निदर्शने

## महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने वेधले प्रलंबित विषयांकडे लक्ष




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महावितरण कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कल्याण मधील तेजश्री या महावितरणच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने केंद्रीय नेतृत्वाच्या आदेशानुसार प्रलंबित विषय व मागण्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भव्य द्वार सभा आयोजित करत निदर्शने करण्यात आली.

या द्वार सभेस संघटनेचे उपसरचिटणीस कॉ. अरुण म्हस्के, संयुक्त सचिव औदुंबर कोकरे, केंद्रीय सदस्य अविनाश शेवाळे, कीर्तिकुमार मुकणे, अशोक बामगुडे अध्यक्ष, झोनल सचिव संतोष चचाणे, सतीश म्हात्रे, महादेव गायकवाड, विक्रम खंडागळे, महिला पदाधिकारी साधना बहिरम, राधिका पवार, कीर्ती शेंडे, रुपाली, अनिता बोन्द्रे, सीमा महारनावर, हेमलता मडके, शुभांगी, विदयुत सहाय्यक महिला पदाधिकारी तसेच सर्व विभागीय सर्कल झोनल पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरण कंपनीत कार्यरत असलेल्या तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ, प्रधान तंत्रज्ञ व मुख्य तंत्रज्ञ या कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास निश्चित करणे, कर्मचाऱ्यांचे वर्क नॉर्म्स निश्चित करणे, वसुली बाबत होत असलेली दडपशाही बंद करणे, वसुलीची जबाबदारी सर्व संबंधितावर निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता सुधारित परिपत्रक काढणे. तांत्रिक कर्मचारी व यंत्रचालक यांचे पे-अनामिली कमिटीच्या पुढे प्रलंबित असलेले प्रश्न निकाली काढणे.महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व निर्मिती, पारेषण, वितरण विज कंपन्या मधील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करावी. ईपीएफ • ९५ पेन्शन बावत असलेला संभ्रम तात्काळ दूर कराणे. वीज कंपन्यातील ४२००० च्या वर कंत्राटी कामगारांना जेष्ठता यादी तयार करून टप्प्याटप्प्याने शैक्षणिक पात्रतेनुसार पे स्केल तयार करून कायम करण्यात यावे. रिक्त जागा भरताना कंत्राटी कामगारांना विशेष प्राधान्य देण्यात यावे. महावितरण कंपनीची ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देऊ नये. त्या ठिकाणी यंत्रचालकाची मंजूर पदे अंतर्गत अधिसूचना काढून तांत्रिक कर्मचाऱ्यांमधून १०० टक्के पदे भरावी आदी मागण्यांसाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी निदर्शने केली.

# विज्ञानाची ओळख



कशी सांगु ओळख
ती तर आहे सर्वांना
शोधक असतात मुळात
नवीन दिसतं ज्यांना.

रहस्य दळलय काय
निसर्गात भूगर्भात आकाशात
उलगडा होत असतो
तेच विज्ञान शास्रात.

अणु रेणु इथे
अवाढव्य तारे आकाशात
भूमंडळात सारे त्यातुन
वेगळी निर्मिती संशोधनात.


भाग विभाग ज्ञानाचे
घेऊ धडे शास्राचे
प्रगती अफाट यातुन
कल्याण त्यात मानवाचे.

अंधश्रद्धा गाडली विज्ञानाने
जीव सुखावली यंत्राने
शोध अफाट लागले
वरदान ठरले शिकण्याने.

प्रदीप मनोहर पाटील
मु. पोस्ट गणपूर तालुका चोपडा
जिल्हा. जळगाव
मो. 9922239055

# ६५ इमारतींच्या बांधकामास जबाबदार असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करा

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर अध्यक्षाची मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील 65 रेरा घोटाळ्यातील इमारती पाडण्याचे आदेश न्यायालयाने दिले असल्याने या प्रकरणी मनपाचे वाभाडे निघाले आहेत. या प्रकरणी शरद पवार गट राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष भालचंद्र पाटील यांनी आयुक्तांना पत्र देत 65 रेरा अनाधिकृत इमारत घोटळ्या प्रकरणी जबाबदार अधिकारी कर्मचारी यांच्या वर करावाई करण्याबाबत मागणी केली आहे.

न्यायालयाने कल्याण डोंबिवली महानगर पालिका हद्दीतील ६५ इमारती न्यायालयाने अनधिकृत ठरवुन निष्काषीत करण्याचे आदेश दिलेले आहेत. महानगर पालिकेकडून तशी कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. या इमारतीचे बांधकाम करणाऱ्या भुमाफियांनी व महानगर पालिकेतील अधिकारी वर्ग व संबंधीत विभागाच्या बनावट परवानग्या तयार करून रेरा प्राधीकरणाचे प्रमाणपत्र मिळवून सदनिका सर्व सामान्य नागरीकांना अधीकृत असल्याचे सांगून विक्री केल्या.या इमारतीचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी साधारणतः २ वर्षांचा कालावधी लागतो. त्या सदंर्भात अनेक जागरूक नागरिक व सामाजिक कार्येकर्ते यांनी महानगर पालिकेच्या प्रभागक्षेत्र अधिकारी अनधीकृत बांधकाम विभाग यांच्याकडे या अनधिकृत इमारती बाबत तक्रारी केल्या पण महानगर पालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी फक्त नोटीस बजाऊन, आर्थिक तडजोड करुन या बांधकामांना अभय दिले व या मुळे या भुमाफियांना मोठ्या प्रमाणात नागरिकांची फसवणुक केल्याचा आरोप भालचंद्र पाटील यांनी केला आहे.

या फसवणुकीत महानगर पालिकेतील अनधीकृत बांधकाम विभागाचे अधिकारी कर्मचारी, प्रभाग क्षेत्र अधिकारी, नगर रचना विभागातील अधिकारी कर्मचारी तसेच सहाय्यक उपायुक्त अक्षय गुडदे हे देखील सामिल आहेत. न्यायालयाने ही बांधकामे निष्काषीत करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे ६५०० पेक्षा जास्त कुटुंब बेघर होणार आहेत व याला जबाबदार महानगर पालिकेतील भ्रष्ट अधिकारी कर्मचारी असल्याचे पाटील यांनी सांगितले.त्यामुळे या अनधीकृत बांधकाची जबाबदारी प्रभाग निहाय अधिकाऱ्यांवर निश्चित करुन त्यांना तात्काळ निलंबीत करुन गुन्हे दाखल करण्याची कारवाई करावी. अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार, डोंबिवली तर्फे महानगर पालिके विरोधात आंदोलन करण्याचा इशारा भालचंद्र पाटील यांनी दिला आहे. पाटील यांच्या या मागणी पत्रानुसार तत्कालीन अधिकारी कर्मचारी हे वादाच्या भोवार्यात सापडले असल्याचे दिसत आहे. मनपा आयुक्त काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कुसुमाग्रजांच्या कलाकृतींना अभिवादन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जगभरातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा समावेश आहे. कुसुमाग्रज यांच्या संघर्षाला आणि त्यांच्या दर्जेदार कलाकृतींना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने त्यांच्या जन्मदिवशी म्हणजेच '27 फेब्रुवारी' रोजी 'मराठी भाषा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला. 2013 मध्ये याबाबतची अधिकृत घोषणा करण्यात आली

हिच पारंपरा जोपसत राज साहेबांचे खंदे समर्थक श्री. सचिन आवारे यांनी सेंट्रलं रेल्वे मझदूर संघ प्रेसिडेंट आदरणीय श्री. प्रवीण बाजपेयी साहेब आणि महामंत्री श्री. ए. के. दुबे सागेब यांचेआदेशाने मुंबई विभागीय अध्यक्ष श्री. विवेक शिसोदिया साहेब व मुंबई विभाग सचिव राज कुमार साहेब मुंबई विभाग समन्व्यक श्री शांताराम गांगुर्डे साहेब यांच्या सहकार्याने मी मराठी माझी स्वाक्षरी मराठी अभियान २०२५ याचे नियोजन सहकारी श्री . संजीव चौव्हाण , श्री. चेतन थळे, श्री. राजेश कांबळे , श्री. राजेंद्र देसले , श्री. एम. बी. पानसरे , श्री. श्रीकांत झणझणे , श्री पांडूरंग आंधळे , श्री. राजेश पाटील , यांचे सहकार्याने पेढे वाटप व स्वाक्षरी मोहीम राबवली

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# मुंबई ठाण्यात म्हाडा उभारणार वृद्धाश्रम व महिलांसाठी वसतीगृहे




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सर्वसामान्यांच्या हक्काचे स्वस्तातील घराचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या म्हाडामार्फत आता मुंबई आणि कोकण परिसरात वृद्धाश्रम आणि नोकरदार महिलांसाठी वस्तीगृह उभारण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई आणि ठाण्यात वृद्धाश्रम बांधण्यात येणार असून या प्रकल्पाचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे. यामुळे हजारो बेघर वृद्धांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटणार असून त्यांना आपल्या हक्काचा निवारा मिळणार आहे. म्हाडा सर्वसामान्यांच्या हक्काचे स्वस्तातील घराचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या म्हाडामार्फत आता मुंबई आणि कोकण परिसरात वृद्धाश्रम आणि नोकरदार महिलांसाठी वस्तीगृह उभारण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई आणि ठाण्यात वृद्धाश्रम बांधण्यात येणार असून या प्रकल्पाचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे. यामुळे हजारो बेघर वृद्धांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटणार असून त्यांना आपल्या हक्काचा निवारा मिळणार आहे.

पहिल्या टप्प्यात म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे अंधेरी पश्चिमेकडील वर्सोवा, आराम नगर आणि कोकण मंडळामार्फत ठाण्यातील माजीवाड्यातील विवेकानंद नगर परिसरात अत्याधुनिक सर्व सुविधा युक्त वृद्धाश्रम उभारण्याचे प्रस्तावित आहे. याचे नियोजन अंतिम टप्प्यात असून वृद्धाश्रमात काय सोयीसुविधा असाव्यात या सर्व बाबींचा विचार करून याची रुपरेखा निश्चित केली जाईल. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. यानंतर भविष्यात पुणे, नागपूर, नाशिक मंडळातर्फे देखील वृद्धाश्रम उभारले जातील असे म्हाडा कडून सांगण्यात आले आहे.

पहिल्या टप्प्यात म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे अंधेरी पश्चिमेकडील वर्सोवा, आराम नगर आणि कोकण मंडळामार्फत ठाण्यातील माजीवाड्यातील विवेकानंद नगर परिसरात अत्याधुनिक सर्व सुविधा युक्त वृद्धाश्रम उभारण्याचे प्रस्तावित आहे. याचे नियोजन अंतिम टप्प्यात असून वृद्धाश्रमात काय सोयीसुविधा असाव्यात या सर्व बाबींचा विचार करून याची रुपरेखा निश्चित केली जाईल. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. यानंतर भविष्यात पुणे, नागपूर, नाशिक मंडळातर्फे देखील वृद्धाश्रम उभारले जातील असे म्हाडा कडून सांगण्यात आले आहे.

# स्वारगेट बसस्थानक आगार व्यवस्थापकांच्या चौकशीचे आदेश




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईः** पुण्यातील स्वारगेट बसस्थानकामधील एसटी बसमध्ये मंगळवारी एका तरुणीवर अत्याचार करण्यात आला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बसस्थानकप्रमुख व आगार व्यवस्थापकांची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत विभागीय चौकशी करण्याचे तसेच दोषी आढळल्यास तत्काळ निलंबित करण्याचे निर्देश व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनराव यांना दिले.

महिला प्रवाशांच्या सुरक्षेसंदर्भात आढावा घेण्यासाठी उद्या, गुरुवारी एसटीच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक आयोजित करण्यात आली आहे. स्वारगेट महिला अत्याचार प्रकरणात बसस्थानक प्रमुख व आगार व्यवस्थापकांच्या विभागीय चौकशीबरोबरच या स्थानकात कार्यरत असलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांची तात्काळ बदली करून त्यांच्या जागी दुसरे सुरक्षा रक्षक

> **पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात बुधवारी तरुणीवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची गंभीर दखल राज्य सरकारनं घेतली आहे. या प्रकरणी सरकार अॅलर्ट मोडवर आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी पुण्याच्या पोलीस आयुक्तांशी चर्चा केली. त्यांना गंभीरपणे तपास करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

नेमावेत, अशा सूचना सरनाईक यांनी दिल्या. या प्रकरणाचा सविस्तर अहवाल पुढील ७ दिवसांत सादर करण्यात यावा, असे सरनाईक यांनी सांगितले.

राज्यातील बसस्थानक परिसरातील निर्लेखित (भंगार) केलेल्या जुन्या बसेसची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. कारण या बसेसकडे दुर्लक्ष होत असल्याने त्या एक प्रकारे अवैध धंद्याचे अड्डे बनल्या आहेत. भविष्यात कोणत्याही बसस्थानक परिसरात अशा प्रकारच्या बसेस उभ्या करण्यात येऊ नयेत, असे निर्देशही सरनाईक यांनी दिले.

# ठाणे महापालिकेत मराठीची गळचेपी ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महाराष्ट्रात 27 फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून राज्यभर साजरा केला जातो. अशामध्ये ठाण्यामधून मराठीचीच गळचेपी होत असल्याची एक बातमी समोर आली आहे. कारण, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शासनाकडून अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील मराठी भाषेचा शासकीय कार्यालयात वापर करण्याच्या सूचना केल्या आहेत. दुसरीकडे ठाणे महानगर पालिकेमध्ये यापुढे मराठी भाषेतून एमए (कला शाखेतील पदवीधर) शिक्षण घेणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना अतिरिक्त वेतनवाढ न देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे ठाणेकरांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

काही दिवसांपूर्वीच ठाणे पालिकेने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' अभियान राबवले. पण, नुकतेच ठाणे पालिकेने काढलेल्या या परिपत्रकामुळे मराठी भाषेचे वावडे का? असा सवाल ठाणेकरांकडून विचारला जात आहे. दरम्यान, परिपत्रकात असे सांगितले आहे की, सातव्या वेतन आयोगामध्ये शिक्षणावर आधारीत अतिरिक्त वेतनवाढी देय असण्याबाबत शासन निर्देश अद्याप प्राप्त झालेले नाही. यामुळे डीएमजीएफएम, एलएसजीडी, एमए (मराठी) आणि तत्सम अभ्यासक्रमासाठी देण्यात येणाऱ्या अतिरिक्त वेतनवाढीबद्दल प्रशासनाने अंतिम निर्णय देणे आवश्यक असल्याचे निरिक्षण मुख्य लेखापरिक्षक यांनी नोंदविले होते. या निरिक्षणाच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात आल्याने आता यापुढे अशा प्रकारचे शिक्षण घेणाऱ्यांना अतिरिक्त वेतनवाढ देता येणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे जे अशा पध्दतीने शिक्षण घेणार असतील त्यांना अतिरिक्त वेतनवाढ देता येणार नसल्याचे परिपत्रकार नमुद करण्यात आले आहे.

महापालिकेच्या आस्थापनेवरील जे अधिकारी आणि कर्मचारी महापालिकेची पूर्व परवानगी घेऊन डीएमजीएफएम, एलएसजीडी, एमए (मराठी) आणि तत्सम अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करतात, त्यांच्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून अतिरिक्त वेतनवाढ दिली जात होती. विद्यमान खासदार नरेश म्हस्के हे ठाणे महापालिकेमध्ये सभागृह नेते होते, त्यावेळेस तशा आशयाचा ठराव महासभेत मंजूर करण्यात आला. पण, हा ठराव रद्द करायचा असल्यास त्यासाठी पुन्हा महासभेपुढे जाणे अपेक्षित आहे. असे असताना महापालिकेने परिपत्रक काढून यापुढे जे अशा प्रकारचे शिक्षण घेणार असतील त्यांना अतिरिक्त वेतनवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले

# सिंचन आणि पेण शहरासाठी हेटवणे धरणाची निर्मिती -सी.आर म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** कोकण पाटबंधारे विकास महामंडळ या मंडळाने विकास डोळ्यासमोर ठेऊन हेटवणे पेण या धरणाची निर्मिती केली.हा महाकाय धरण खालापूर पाली सुधागड आणि पेण तालुका यांचे त्रिवेणी मिलन म्हणावे वाटते. येथे सिंचनासह विद्युत् विमोचन बोगदा नियोजित आहे त्याची अंदाजे लांबी ३३२ मीटर असून त्याचा आकार २.५० x २.५० मीटर आहे. विद्युत निर्मिती आणि सिंचन,पिण्यासाठी या धरणाची निर्मिती झाली हे मात्र नक्की. स्वर्गीय आमदार माजीमंत्री मोहनभाई पाटील यांनी स्वतःची जमीन,गावातील नागरिकांची जमीन देऊन,बरीच गावे यामध्ये विस्थापित झाली.लोकांची पण एक भावना होती की आपल्या खारेपाट विभागातील लोकांची पाण्याची तडफड कमी होईल.पण प्रत्यक्षात आजही परिस्थिती आहे तशीच आहे.सुमारे तीस पस्तीस वर्ष सत्ताधारी, विरोधकांनी,काही केल्याचे दिसत नाही.

आमदारांची अदला बदल झाली,पाणी प्रश्न मात्र सुटला नाही.निवडणूक आली की प्रत्येक पक्ष दंड थोपटून सांगत होता २४ तास



पाणी मिळेल मला निवडून आणा.पण सत्ता आली मंत्रीपदे मिळाली पण पुनश्च हरी ओम.माजी आमदार आणि आताचे राज्यसभा खासदार धैर्यशिल पाटील हे पदयात्रा आंदोलन आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन मंत्रालयाला धडक देणार होते,आणि या प्रकरणात ३२.४० कोटीचा निधी मा. देवेन्द्र फडणवीस यांनी भाई जयंत पाटील यांच्या समोर मंजूर केला ,निधी मिळाला,निधी संपला, पण पाणी मिळाले का नाही? हा झाला इतिहास.

आलेला पैसा लोकांचा लोकांसाठी वापरला गेला पाहिजे,पण निधीत कोण कधी मोठा होईल सांगता येत नाही तसे नेहमीच घडते.जेव्हा पाण्याची कमतरता असते तेव्हा खरे काटकसरीचे धोरण असते. पण येथे तर पेण शहरात लगतच्या भोगावती नदीत २४ तास पाणी सोडले जाते प्रचंड मोठ्या प्रमाणात हे पाणी भाल खाडीपर्यंत गोडे होते.मात्र ना अधिकारी वर्गाला चिंता,ना आमच्या सर्वच नेत्यांना.याचे योग्य नियोजन करून,फुकट जाणारा पाणी जर खारे पाट विभागाला दिले गेले तर भविष्यात पाणी टंचाई दिसणार नाही. माझ्या मते असे केले तर टँकर लॉबी कशी पोसली जाईल हा ही पोटापाण्याचा विषय आहेच.

आज जर हेटवणे धरणापासून अंतोरा खाडीपर्यंत फेर फटका मारला आणि पाहिले तर काय दृश्य आहे.दोन्ही नदी तीरावर हिरवळ नदीचं हिरवगार पाणी आणि आमचा विभाग याच पाण्यासाठी आंदोलने करत आहे.

हे वाहणारे जिवंत पाणी बाटली मधील डेड पाण्यापेक्षा उत्तम आहे हे प्रशासनाला कधी समजणार. पेण तालुका आज jsw मुळे नावारूपाला आला आहे.कित्तेक परप्रांतीय आपला व्यवसाय थाटून आहेत.१० वर्षा अगोदर स्थानिकांची दुकाने भाड्याने घेऊन मोठी रक्कम डिपॉझिट म्हणून देऊन कायमचे मालक बनणार आहेत. हे अंतीम सत्य आहे.

पूर्वी पेण स्टेशन पासून चावडी नाक्यापर्यंत आपली दुकाने होती. आणि आत्ता. हातावर मोजण्याइतकीच राहिलीत. त्यांच्या प्रगतीच रहस्य ना सण,ना खेळ, ना राजकारण मेहनत आणि मेहनत.आम्ही खारेपाट विभागातील जनता मात्र शेतीतून प्रगती करू फक्त पाणी मिळू दे,आज प्रायोगिक तत्वावर तलावाच्या पाण्यावर शेती भाजीपाला पिकवित आहेत.ते पुढील काही दिवसात मिडिया समोर येणारच आहे..jsw कंपनीने शेतकऱ्यासाठी काही हितगुज करण्याचे कार्यक्रम राबवायला सुरुवात केली आहे.त्यांचा काही उद्देश असेल ते सोडून द्या पण उत्तम प्रतिसाद मिळत आहे.यातून जर शेतीसाठी पाणी मिळाले तर विभागात बांधावर भाजी पिकवतील हे नक्की पण एक संधी सरकारने देऊन पहा.पण सिंचनासाठी ७६६ कोटी मंजूर जगजाहीर झाले.

सुनील तटकरे पुन्हा रायगडचे. खासदार झाले या मुळेच लोकांनी भरभरून त्यांच्या झोळीत मते टाकली कारण दिलेल्या शब्द या साठी ते पक्के आहेत पण त्यांनी एका भगिनीच्या डोक्यावरील हंडा त्यावेळी उतरविला आहे. सिंचनाचे पाणी सुरू झाले की त्यांची पादत्राणे डोक्यावर घेऊन विभागात जाणार आहेत अशी शपथ एका मोठ्या समाज सेवकाने घेतली आहे.त्यामुळे रोहाआणि पेण चे एकमत झाले पाहिजे. साहेबांचे वचन पूर्ण झाले पाहिजे आणि त्यांनीच ते पूर्ण करावे ही आंदोलकांची,लोकांची मागणी आहे.याचा फायदा सर्वांचा होईल.

शेवटी एक प्रश्न आजची पिढी विचारते शेती करायला माणसे मिळत नाहीत पण पूर्वीच्या काळात शहापूर, शहाबाज पेण येथील बरेच शिक्षक नोकरी करून शेती करत होते , त्यांनी अजून पर्यंत शेती सांभाळलेली आहे. आपण तरुणाई सुद्धा तसे करू शकतो, पण ईर्षा हवी. करूया प्रयत्न, आणुया सिंचनाचे पाणी. एकदा करून तर पहा नाहीतर आहे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट...MMRDA.. त्याला आपण तर विरोध करूच. जर त्यांची भूमिका पटली नाही तर.नाहीतर आले देवाजीच्या मना तेथे सामान्यांचे चालेना.असे म्हणावे लागेल. असे सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी सांगितले

# नवीमुंबईच्या घशाला कोरड पडणार?
## मोरबे धरणात केवळ १८८ दिवसांचा जलसाठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** - राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराला पाणीपुरवठा कणाऱ्या धरणात पाणीसाठी निम्म्यावर आला असून जुलै महिन्यापर्यंत पाणीपुरवठ्याचे आव्हान पेलावे लागणार असताना दुसरीकडे स्वताःच्या मालकीचे धरण असलेल्या नवी मुंबईतील मोरबे धरणात मात्र गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत अधिक जलसाठा शिल्लक आहे. परंतु तरीही नागरीकांनी पाण्याचा वापर जपूनच करा असे आवाहन केले आहे. मोरबे धरणात अजून १८८ दिवस शहराला सुरळीत पाणीपुरवठा करण्याएवढा जलसाठा धरणात शिल्लक आहे. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलसाठ्यांमध्ये जवळजवळ अर्ध्यावर पाणीसाठा शिल्लक असून मागील काही दिवसांपासून मुंबई व नवी मुंबईतही तापमानाचा टक्का अधिक आहे. तर त्या तुलनेत मोरबे धरणात ६० टक्क्यांपेक्षा अधिक जलसाठा आहे.त्यामुळे नवी मुंबईला ऑगस्ट अखेरपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा मोरबे धरणात शिल्लक आहे.

नवी मुंबई महापालिकेचे मोरबे धरण यावर्षी २८ ऑगस्ट २०२४ ला १०० टक्के भरले व धरणातून पाण्याचा विसर्गही करण्यात आला होता. पालिका आयुक्त व मान्यवरांच्या हस्ते यंदा जलपूजनही करण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर स्वतःच्या मालकीचे धरण असणारी नवी मुंबई ही मुंबई महापालिकेनंतरची देशातील पहिली महापालिका आहे. परंतु लोकसंख्येच्या मानाने धरणातून अधिक पाणीउपसा केला जात आहे. दिवसाला धरणातून ४५० दशलक्षलीटर पेक्षा अधिक पाणी उपसा केले जात असून त्यावर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. शहरातील नागरिकांना पालिका प्रशासनाकडून जपून पाणी वापराचे आवाहन केले जात असताना पालिका प्रशासनानेही प्रतिमाणसी फक्त २०० लीटर पाणीच देणे आवश्यक आहे.

> **यंदा मोरबे धरणक्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने धरण १०० टक्के भरले होते. पाणी उपशाबाबत योग्य काळजी घेण्यात येत असून उद्याने व इतर ठिकाणी जास्तीत जास्त प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करण्यावर भर दिला आहे. धरणात गेल्यावर्षीच्या तुलनेत अधिक पाणी असले तरी पाणीपुरवठ्याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे.**
>
> **- अरविंद शिंदे,**
> **अतिरिक्त शहर अभियंता,**
> **नवी मुंबई महापालिका**


**कल्याण डोंबिवली महानगर पालिका**

**शिक्षण विभाग, कल्याण**

**पहिला मजला, झोझवाला कॉम्प्लेक्स, सहजानंद चौक कल्याण (प)**
**दुरध्वनी क्रमांक ०२५१-२२०३६२१ Email-sskdmc@yahoo.co.in**

**फेरनिविदा (द्वितीय मागणी)**
**सुचना क्रमांक ०६ (सन २०२४-२५)**

सन २०२४-२५ या वर्षासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत नोंदणीकृत निविदाधारक / लघुउद्योजक संस्था यांचेकडून महानगरपालिका शाळांतील बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी मुलभुत शिक्षण व लेखन साहित्य खरेदीसाठी ई-टेंडरिंग दोन लिफाफा पध्दतीने फेरनिविदा मागविण्यात येत आहेत.

१) इच्छुक निविदाधारकांना www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ही निविदा खरेदी करुन भरता येईल.
२) निविदा अर्जाची विक्री दिनांक २८/०२/२०२५ ते दिनांक १४/३/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.
३) निविदा भरण्याचा कालावधी दिनांक २८/०२/२०२५ ते दिनांक १४/०३/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.
४) निविदापूर्व बैठक दिनांक ११/०३/२०२५ रोजी सकाळी/दुपारी ०३:०० वाजता मा.उप आयुक्त (शिक्षण) यांचे दालनात आयोजित करण्यात आली आहे.
५) प्राप्त निविदा दिनांक १७/०३/२०२५ रोजी दुपारी ०४:०० वाजता नागरी सुविधा केंद्र ई-टेंडर विभाग, कडोंमपा कल्याण येथे उपस्थित निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.
६) एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवले आहेत.

सही/-
उप आयुक्त
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
शिक्षण विभाग, कल्याण

*जावक क्रमांक :कडोंमपा/ जसवि./ मुका / २२३ दिनांक- 27/02/2025


# वातानुकूलित लोकलमधील फुकट्यांकडून पावणे दोन कोटी दंड वसूल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : पश्चिम रेल्वेवरील वातानुकूलित, सामान्य लोकलमधून विनातिकीट प्रवाशांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे तिकीटधारक प्रवाशांचा प्रवास गैरसोयीचा होत आहे. विनातिकीट प्रवाशांमुळे पश्चिम रेल्वेच्या महसुलावर परिणाम होत आहे. त्यामुळे पश्चिम रेल्वेने चालू आर्थिक वर्षात जानेवारी २०२५ पर्यंत वातानुकूलित लोकलमधून ५१हजार ६०० विनातिकीट प्रवाशांना पकडून त्यांच्याकडून १.७२ कोटी रुपये दंड वसूल केला.

जगातील सर्वाधिक व्यस्त रेल्वे व्यवस्थेच्या यादीत मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गाचा क्रमांक लागतो. उपनगरीय रेल्वे सेवेवरून दररोज लाखोंच्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. पश्चिम रेल्वेवर दररोज १,४०६ लोकल फेऱ्या धावतात. या लोकल फेऱ्यांमधून सुमारे ३० लाख प्रवासी प्रवास करतात. परंतु, हजारो प्रवासी तिकीट न काढता प्रवास करीत असल्याने त्यांची नोंद होत नाही. त्यामुळे तिकीटधारक प्रवाशांना योग्य सुविधा पुरवण्यात काही वेळा अडचणीचे ठरते. पश्चिम रेल्वेवरील सर्व तिकीटधारक प्रवाशांना त्रासमुक्त, आरामदायी प्रवास आणि चांगल्या सेवा देण्यासाठी, विनातिकीट प्रवाशांची धरपकड सुरू आहे.

पश्चिम रेल्वेवर सध्या १०९ वातानुकूलित लोकल फेऱ्या धावतात. यामधून दररोज सुमारे १.२६ लाख प्रवासी प्रवास करतात. २०२४-२५ या आर्थिक वर्षात (जानेवारी २०२५ पर्यंत) मुंबई सेंट्रल विभागाच्या तिकीट तपासणी पथकाने वातानुकूलित लोकलमध्ये विनातिकीट प्रवाशांची ५१ हजार ६०० हून अधिक प्रकरणे सापडली. या प्रकरणातून दंड स्वरूपात १.७२ कोटी रुपये वसूल करण्यात आले.

जानेवारी २०२५ मध्ये विनातिकीट प्रवासाच्या ६,२५८ प्रकरणांमध्ये २०.९७ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. तर, जानेवारी २०२४ मध्ये ४,७४३ प्रकरणांमध्ये १६.०४ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. दंडाच्या रकमेत ३१ टक्के आणि पकडलेल्या प्रकरणांच्या संख्येत ३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

तिकीटधारक प्रवाशांचा प्रवास सुधारण्यासाठी आणि वातानुकूलित लोकलमध्ये विनातिकीट प्रवाशांचा प्रवास रोखण्यासाठी, पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल विभागाने अनेक उपक्रम सुरू केले आहेत. त्यात अनियमित प्रवासाच्या प्रकरणांवर लक्ष ठेवण्यासाठी वातानुकूलित लोकलमध्ये एक पथक तयार करण्यात आले आहे. या पथकामार्फत नियमित तपासणी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच वातानुकूलित लोकल प्रवाशांना तक्रार करण्यासाठी मदतवाहिनी क्रमांक १३९ प्रदान करण्यात आला आहे. तसेच व्हॉट्स ॲप क्रमांक ९००४४९७३६४ वर तक्रार करता येणे शक्य आहे. त्याची त्वरित दखल घेऊन तक्रारीचे निवारण करता येणार आहे.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे नवी दिल्ली येथे परिषद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांची ४ व ५ मार्च, २०२५ रोजी दोन दिवसांसाठी भारत इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (IIIDEM), नवी दिल्ली येथे परीषद आयोजित केली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांचे अध्यक्षतेखाली होणारी ही अशी पहिलीच परिषद आहे. मुख्य निवडणूक आयुक्त यांनी अगदी प्रथमच या परिषदेकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी यांना नामनिर्देशीत करण्याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी यांना सूचित केले आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी हे वैधानिक प्राधिकारी म्हणून राज्य, जिल्हा व मतदार संघाकरीता महत्वाचे अधिकारी आहेत.या दोन दिवसीय परीषदेतून राज्य तसेच केद्रशासीत प्रदेशांच्या अधिका-यांना विचारमंथन व परस्परांना आलेले अनुभव यातून शिक्षणासाठी एक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या दोन दिवसीय परीषदेच्या पहिल्या दिवशी आधुनिक निवडणूक व्यवस्थापनातील मुख्य क्षेत्रासह आयटी आर्किटेक्चर, प्रभावी संप्रेषण, सोशल मीडियाचा प्रसार वाढवणे आणि मतदान प्रक्रियेतील विविध अधिका-यांची वैधानिक भूमिका यासह प्रमुख मुद्यांवर चर्चा होईल. परीषदेच्या दुस-या दिवशी राज्ये/केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी पहिल्या दिवशी झालेल्या मुद्देनिहाय चर्चेच्या अनुषंगाने आपला संबंधित कृती आराखडा सादर करतील, असे भारत निवडणूक आयोगाने आपल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## संक्षिप्त

### वेल्श सरकारच्या गुंतवणुकीच्या स्वारस्याचे महाराष्ट्रात स्वागत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचे आणि नाविन्यपूर्ण शक्तीचे केंद्र आहे. येथे भागीदारीसाठी मोठी संधी आहे. वेल्श सरकारच्या तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा, शिक्षण यांसारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीसाठी असलेल्या स्वारस्याचे महाराष्ट्र स्वागत करीत असून वेल्शसोबतचे संबंध दृढ करण्यासाठी महाराष्ट्र वचनबद्ध आहे, अशा शब्दात राजशिष्टाचार तथा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी वेल्श सरकारच्या सेंट डेव्हीड डे (वेल्श नॅशनल डे) निमित्त शुभेच्छा दिल्या.

सेंट डेव्हीड डे निमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात वेल्श सरकारला शुभेच्छा देताना श्री.रावल बोलत होते. वेल्श सरकारचे कॅबिनेट सचिव जेरेमी माइल्स, वेल्श सरकारचे भारतातील प्रमुख मिचेल ठाकर आदी यावेळी उपस्थित होते. राजशिष्टाचार मंत्री रावल म्हणाले, सेंट डेव्हिड डे हा सेवा, समर्पण आणि समुदायाच्या चीरस्थायी मूल्यांचे प्रतीक आहे. प्रगती आणि विकासासाठी आमची सामायिक वचनबद्धता आम्हाला सहकार्याचे नवीन मार्ग शोधण्यासाठी प्रेरित करते. महाराष्ट्र आणि वेल्श एकत्र काम करून विकासाबरोबरच नागरिकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करू शकतो आणि अधिक समृद्ध भविष्यासाठी योगदान देऊ शकतो, असा मला विश्वास आहे.सेंट डेव्हिड डे साजरा करताना कार्डिफ विद्यापीठाचा माजी विद्यार्थी या नात्याने मला आनंद आणि वैयक्तिक संबंधाची भावना असून माझ्यासाठी हा प्रसंग विशेष महत्त्वाचा असल्याचे श्री.रावल यांनी सांगितले. कार्डिफ विद्यापीठात असताना मी आत्मसात केलेल्या तत्त्वांनी माझ्या दृष्टीकोनाला आकार दिल्याचे त्यांनी नमूद केले. आज सेंट डेव्हिड डे साजरा करीत असताना महाराष्ट्र आणि वेल्शमधील संबंधांना जोपासण्यासाठी, सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवण्यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### महाराष्ट्र परिचय केंद्रात 'मराठी भाषा दिन' साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : महाराष्ट्र परिचय केंद्रात 'मराठी भाषा गौरव दिन' आज साजरा करण्यात आला. परिचय केंद्राच्या ग्रंथालयात वि. वा. शिरवाडकर उपाख्य 'कुसुमाग्रज' यांच्या प्रतिमेस उपसंचालक अमरज्योत कौर अरोरा यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. शासनाच्यावतीने 'कुसुमाग्रज' यांची जयंती 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरी केली जाते. यावेळी माहिती अधिकारी अंजू निमसरकर व उपस्थित कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

'मराठी भाषा गौरव दिन' आणि 'कुसुमाग्रज' वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये अतिशय उल्लेखनीय योगदान आहे. एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, नाटककार व कादंबरीकार म्हणून त्यांची ख्याती आहे. 'कुसुमाग्रज' या नावाने त्यांनी काव्य लेखन केले. प्रसिद्ध साहित्यिक वि.स.खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे कुसुमाग्रज दुसरे साहित्यिक ठरले. कुसुमाग्रज यांचे एकूण २४ कविता संग्रह , ३ कादंबऱ्या, १६ कथा संग्रह, १९ नाटके आणि ४ लेखसंग्रह आदी साहित्य प्रसिद्ध आहे. १९६४ मध्ये गोवा येथे आयोजित 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे ते अध्यक्ष होते. १९७४ मध्ये त्यांच्या 'नटसम्राट' या नाटकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

### कोकण विभागीय पेन्शन अदालतीचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. 11 मार्च 2025 रोजी सकाळी 11.00 वा. कोकण भवनातील कक्ष क्र. 106 सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग तहसिलदार,(सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने वाढवण बंदर महत्त्वाचे

## – मंत्री नितेश राणे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर:वाढवण बंदर महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या एका बंदरामुळे देशाच्या आणि महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात असून देशाला महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊन म्हणजे वाढवण बंदर प्रकल्प असल्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

वाढवण बंदराच्या विकास प्रकल्पाची आढावा बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृह , जिल्हाधिकारी कार्यालय, येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री . राणे बोलत होते. या बैठकीस आ.राजेंद्र गावित,आ. विलास तरे, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी



पी.प्रदिप, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त दिनेश पाटील, आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री.राणे पुढे म्हणाले वाढवण बंदरामध्ये महाराष्ट्र शासनाचा 26 टक्के वाटा आहे. त्यामुळे येथील स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकल्पाचा केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचे श्री. राणे यांनी सांगितले. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांच्यामार्फत स्थानिकांना विविध क्षेत्रातील कलागुणांना वाव देऊन त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.त्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

वाढवण बंदरामुळे मोठा रोजगार निर्माण होणार आहे तो पालघर जिल्हयातील स्थानिकांना मिळायला पाहिजे. स्थानिक मच्छिमारांच्या मुलांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. जेणेकरून त्यांची भावी पिढी या प्रकल्पाच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभी राहिल व आर्थिक सक्षम होइल. त्याबाबत संबंधितांना प्रशिक्षण देऊन वाढवण बंदराच्या माध्यमातून शेवटच्या व्यक्तीचा विकास आणि आर्थिक सक्षम करण्याचे काम या प्रकल्पाच्या माध्यमातून होणार असून यासाठी प्रकल्प उभारणीच्या कामात संबंधित अधिकारी यांनी जलदगतीने काम करावे, अशा सूचना मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बंदर विकास विभागा मार्फत होणारी गुंतवणूक व त्याची परिस्थिती काय आहे. प्रकल्पाची कामे कुठपर्यंत आली आहेत. याचा आढावा श्री . राणे यांनी घेतला.

# प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दाखला हस्तांतरणाबाबत होणार सुधारणा

## – मकरंद जाधव-पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : प्रकल्पग्रस्त व्यक्तीस प्रदान केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरण करण्याबाबतच्या २ मे २०१६ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली आहे. या निर्णयाचा पात्र प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरी मिळविण्यासाठी लाभ होईल व त्यांचे जीवन अधिक सुकर होईल, असा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

याबाबतचा शासन निर्णय २५ फेब्रुवारी २०२५ रोजी जारी करण्यात आला आहे. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव पाटील यांनी सांगितले, पात्र प्रकल्पग्रस्त व्यक्तीस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र दिल्यानंतर प्रथम नामनिर्देशित वारसदारास हस्तांतरणास कालमर्यदा राहणार नाही; तथापि तदनंतर मात्र नामनिर्देशित विहित वारसदारास हस्तांतरण करावयाचे झाल्यास सहा महिन्याची मर्यादा लागू राहील. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हस्तांतरण पात्र एकाच नामनिर्देशित व्यक्तीस देण्यात येईल, अशी सुधारणा करण्यात आली आहे.

प्रकल्पग्रस्त दाखल्याचे हस्तांतरण करताना प्रकल्पग्रस्त दाखला निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून प्रकल्पग्रस्त दाखला ६ महिन्यांच्या आत बदलता येणार नाही, अशी अट दि. २ मे २०१६ च्या शासन निर्णयात होती. या अटीमुळे मूळ प्रकल्पग्रस्त दाखलाधारकास त्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीस दाखल्याचे हस्तांतरण करण्यास विलंब होऊन त्याला प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून शासकीय सेवेत नियुक्ती मिळवणे शक्य होत नव्हते. व परिणामी संबंधीत प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन ख-या अर्थाने पूर्ण होत नव्हते. त्यामुळे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारकास त्यांचे पात्र एका नामनिर्देशित वारसास प्रथम वेळी हस्तांतरण करण्याची कालमर्यदा शिथिल करण्यात आली.

प्रकल्पबाधीत कुटुंबातील एका व्यक्तीस गट क व गट ड संवर्गातील पदाच्या पदभरतीमध्ये आरक्षण असून स्पर्धा परीक्षा देऊन नियुक्ती करण्यात येते. प्रकल्पग्रस्त प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदांवर प्रकल्पबाधीत उमेदवारांकरीता ५ टक्के आरक्षणाची तरतूद आहे. या पदांवर नियुक्ती करण्यासाठी शैक्षणिक अर्हता विहीत केली असून प्रकल्पबाधित उमेदवाराने वयोमर्यादेची अट उलटून गेल्यास त्याला नोकरीसाठी अर्ज करता येत नाही. तसेच प्रकल्पबाधीत व्यक्तीकडे शैक्षणिक अर्हता नसल्याने व वयोमर्यादा उलटल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे आरक्षणाचा लाभ घेऊन प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून शासकीय नोकरी मिळवणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्ताचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना प्रकल्पग्रस्त दाखला बदलून मिळण्यासाठी अडचणी येतात. या सर्व बाबींच्या विचार करून २ मे २०१६ मधील शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव पाटील यांनी सांगितले.

# अंबरनाथ नाटयगृहास अण्णाभाऊ साठेंचे नाव दया -पुरोगामी संघटनांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथ नगरपरिषदेच्या अखत्यारीतील नव्याने उभं राहणार्या सर्कस मैदान येथील नाट्यगृहाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नामकरणासाठी अंबरनाथ व आसपासच्या उपनगरातील सामाजिक व सांस्कृतिक संघटनांनी आता जोर धरला आहे.




साहित्याच्या सर्व क्षेत्रात मुसाफिर करणाऱ्या अण्णाभाऊंचा अंबरनाथच्या या भूमीला पदस्पर्श लाभलाय. अल्पशिक्षणाच्या चोरावर असामान्य साहित्यकला कृती निर्मिती हे त्यांचं वैशिष्ट्य इतिहासाला ही मान्य करावं लागलं. याकरिता लोकभावनांच्या आधारे प्रशासनाने या नाट्यगृहास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव द्यावे अशी मागणी आज ५० पेक्षा अधिक सामाजिक संस्थांनी निवेदन देऊन अंबरनाथ प्रशासनास केली आहे. यासंदर्भात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह नामकरण संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक, धार्मिक व कलाक्षेत्रातील संघटनांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने आज अंबरनाथ नगरपरिषदचे मुख्याधिकारी अभिजित पराडकर यांची भेट घेतली. व आपली ही मागणी सरकारकडे ताकदीने मांडावी असा आग्रह धरला. लोक भावनांचा आदर करून सदर प्रकरण हे आपण शासनाकडे प्रस्तावित करणार असल्याचा सकारात्मक प्रतिसाद यावेळी पराडकर यांनी शिष्ट मंडळास दिला.

# राज्य सीईटी सेलच्या 'सीईटी-अटल' विशेष उपक्रमात १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शिक्षणातील संधी आणि क्षमता ओळखण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून राज्य सामाईक प्रवेश कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षांचा सराव करता यावा यासाठी 'अटल' उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या विशेष उपक्रमात आतापर्यंत १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, या उपक्रमाअंतर्गत मॉक टेस्ट्स आणि सायकोमेट्रिक टेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेता येतो. आणि या सराव परिक्षांमुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर त्या विषयातील शैक्षणिक संधी आणि प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना येणारा ताण कमी होईल आणि शैक्षणिक वाटचालीत पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे या उपक्रमात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहनही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

सायकोमेट्रिक टेस्टद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व त्यांच्या क्षमतांनुसार योग्य शैक्षणिक आणि व्यावसायिक विषयांची निवड करण्यास मदत होईल. हा उपक्रम" हे केवळ परीक्षा तयारीपुरता मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक करिअरला प्रोत्साहन देणारा आहे, असेही श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.


या उपक्रमात राज्यातील विविध महाविद्यालयांचा सहभाग असून कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन या विद्याशाखांचा समावेश आहे. यासाठी विविध माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धी करण्यात येत आहे. आतापर्यंत १ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. यामध्ये ५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी सराव करता यावा आणि विद्यार्थ्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक, माहिती उपलब्ध व्हावी आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. अधिक माहीतीसाठी, https://cetcell.mahacet.org/ या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# खेळ म्हणजे स्पर्धा नव्हे तर सौहार्द व आत्मिक उत्थानाचे माध्यम

## – निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आत्मिक शांती आणि खिलाडूवृत्तीचा दिव्य संगम साकार करत 25व्या (रौप्य महोत्सवी) बाबा गुरबचनसिंह मेमोरियल क्रिकेट टूर्नामेंटचा भव्य शुभारंभ बुधवारी संत निरंकारी आध्यात्मिक स्थल, समालखा येथे झाला. या प्रसंगी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांनी या टूर्नामेंटचे विधिवत उद्घाटन करुन हे आयोजन आणखी प्रेरणादायक बनवले. 26 फरवरी ते 12 मार्च पर्यंत आयोजित होत असलेल्या या प्रतिष्ठित व रोमांचक क्रिकेट टूर्नामेंटमध्ये देशभरातील विविध राज्यांतून 24 सर्वश्रेष्ठ टीमची निवड करण्यात आली आहे.



ज्यामध्ये महाराष्ट्र, पंजाब, जम्मू, हिमाचल प्रदेश, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान व गुजरात इत्यादि प्रमुख राज्यांचा समावेश आहे. सतगुरु माताजींच्या निर्देशानुसार, या भव्य आयोजनाचे संचालन आदरणीय श्री.जोगिंदर सुखीजा (सचिव, संत निरंकारी मंडळ) यांच्या नेतृत्वामध्ये केले जात आहे. या टूर्नामेंटची सुरवात बाबा हरदेवसिंहजी यांनी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ केली. बाबा गुरबचनसिंहजी यांनी युवावर्गाला सदैव खेळांसाठी प्रेरित केले ज्यायोगे त्यांच्या ऊर्जेला सार्थक दिशा देऊन समाज व राष्ट्राच्या उत्कर्षामध्ये सकारात्मक योगदान दिले जाऊ शकेल. सतगुरु माताजींनी खेळांच्या प्रति खेळाडूंना प्रोत्साहित करताना आपल्या आशीर्वचनामध्ये सांगितले, की खेळ ही केवळ प्रतिस्पर्धा नसून सौहार्द, सन्मान आणि टीमवर्कचा दिव्य संदेश देतो. यावर्षी 24 टीमचा सहभाग परस्पर ताळमेळ आणि आपुलकीची भावना कशाप्रकारे सर्वांना एकत्र आणू शकते याचा दाखला देते. या प्रतियोगितेमध्ये पहायला मिळाले, की खेळाडू जिंकण्या-हरण्याच्या पलीकडे जाऊन बंधुभाव आणि समर्पण भावनेने खेळाचा आनंद घेत आहेत.या भव्य आयोजनामध्ये संत निरंकारी मंडळाच्या सदस्यांसह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती होती. टूर्नामेंट सुरळीत व यशस्वीरित्या पार पडावी यासाठी व्यापक प्रबंधदेखील करण्यात आले आहेत. भाग घेणारे खेळाडू आणि प्रेक्षकांच्या सुविधेसाठी निवासी व्यवस्था, स्वास्थ्य सेवा, जलपान, आपत्कालीन सहायता, सुरक्षा व पार्कींग यांसारख्या सर्व आवश्यक व्यवस्था सुनिश्चित करण्यात आल्या आहेत ज्यायोगे हे आयोजन सुगम, स्मरणीय आणि व्यवस्थित बनू शकेल.

# डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्र. पाचला मिळाले छप्पर

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठपुराव्याला यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली रेल्वे स्थानक परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्या तसेच प्लॅटफॉर्म क्रमांक 5 वरील १५-१६ वर्षा पासून नसलेल्या छताच्या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या वतीने काही महिन्यांपूर्वी रेल्वे प्रशासनाला लेखी निवेदन देण्यात आले होते. रेल्वे प्रशासनाने समस्यांचे त्वरित निराकरण न केल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन छेडण्याचा ठाम इशारा यावेळी देण्यात आला होता.या समस्यांचा सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची तातडीने दखल घेतली आणि गेल्या 15-20 वर्षांपासून प्रलंबित



असलेले डोंबिवली प्लॅटफॉर्म क्रमांक 5 वरील मुंबई दिशेकडील छताचे काम अखेर सुरू झाले आहे. काही प्रमाणात शेड बसवण्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संघर्षाचा आणि प्रवाशांच्या न्याय्य हक्कांसाठी लढलेल्या आंदोलनाचा मोठा विजय असून भविष्यातही जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी पक्ष लढत राहील आणि प्रवाशांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहील असे दिपेश म्हात्रे यांनी सांगितले.यावेळी शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे, उप शहर प्रमुख सुरज पवार, शहर संघटक संजय पाटील व उप शहर संघटक सुरेश परदेशी, शहर संघटिका प्रियंका विचारे, विभाग प्रमुख राजेंद्र सावंत, प्रवीण विरकुट, युवासेना विधानसभा अधिकारी आदित्य पाटील, स्वप्नाली शेंडगे शाखा संघटिका रिचा कामटेकर, युवती सेना शहर अधिकारी शुभांगी घोरपडे, उप शाखा संघटिका तसेच नागरिकांच्या उपस्थितीत कामाचा शुभारंभ करण्यात आला. नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त करत दिपेश म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024